आकाशवाणी नागपूर,

प्रादेशिक बातम्या (मराठी–वेळ सायंकाळी ०६.००)

रविवार दिनांक १४ सप्टेंबर २०२५

ठळक बातम्या

1. आसाममध्ये १८ हजार ५३० कोटी रुपये खर्चाच्या पायाभूत आणि औद्योगिक विकास प्रकल्पांचं पंतप्रधानांच्या हस्ते उद्घाटन

2. आरक्षणाच्या रक्षणासाठी ओबीसी संघटनांचा १० ऑक्टोबर रोजी नागपुरात महामोर्चा

3. सातारा इथे होणाऱ्या ९९ व्या अखिल भारतीय साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ साहित्यिक विश्वास पाटील यांची निवड

4. आशिया चषक क्रिकेट स्पर्धेत आज भारताचा सामना पाकिस्तानशी

5. राज्यात पुन्हा पावसाची जोरदार हजेरी; पुढील काही दिवस मुसळधार पावसाचा इशारा

पंतप्रधान  नरेंद्र मोदी - आसाम

भारत जगातला सर्वात वेगानं विकसित होणारा देश असून, त्याचप्रमाणे आसाम देखील देशातल्या सर्वात जलद वाढ नोंदवणाऱ्या राज्यांपैकी एक आहे, असं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. मोदींच्या हस्ते आज आसाममध्ये दरांग इथं १८ हजार ५३० कोटी रुपयांच्या पायाभूत आणि औद्योगिक विकास प्रकल्पांचं उद्घाटन आणि भूमिपूजन झालं, त्यावेळी ते बोलत होते

*यह प्रयास विकसित असम का रास्ता और मजबूत करेंगे . असम भारत के  ऊर्जा सामर्थ्य को बढ़ाने वाली धरती है.  यहाँ से निकले पेट्रोलियम प्रोडक्ट देश के और  विकास को गति देते हैं।)*

संपूर्ण देश आज विकसित भारताच्या निर्मितीसाठी एकजुटीनं कार्य करत असून त्यात मुख्यत्वे युवावर्गाचं योगदान बहुमोल आहे, असं त्यांनी सांगितलं.

## हिंदी दिवस

आज देशभरात हिंदी दिवस साजरा केला जात आहे. १९४९ मध्ये याच दिवशी संविधान सभेन देवनागरी लिपीत लिहिलेल्या हिंदीला देशाची अधिकृत भाषा म्हणून स्वीकारले होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सर्व नागरिकांना हिंदी दिवसाच्या शुभेच्छा दिल्या आहेत. तर हिंदी भाषा देशातल्या विविध भाषा आणि बोलींमध्ये सेतूचं काम करते, असं अमित शहा यांनी म्हटलं आहे. शहा यांच्या हस्ते आज गुजरातमधल्या गांधीनगर इथं पाचव्या अखिल भारतीय राजभाषा परिषदेचं उद्घाटन झालं, त्यावेळी ते बोलत होते.

## राज्यपाल आचार्य देवव्रत

गुजरातचे राज्यपाल आचार्य देवव्रत, हे उद्या महाराष्ट्राच्या राज्यपाल पदाची शपथ घेतील. उद्या सकाळी ११ वा. त्यांचा शपथविधी होईल. या शपथविधी समारंभासाठी त्यांचं आज मुंबईत आगमन झालं. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री शिंदे यांनी मुंबई सेंट्रल रेल्वे स्थानकावर त्यांचं स्वागत केलं. सी.पी. राधाकृष्णन यांच्या उपराष्ट्रपती पदावर निवड झाल्यान रिक्त झालेल्या महाराष्ट्राच्या राज्यपाल पदाची अतिरिक्त जबाबदारी राष्ट्रपतींनी आचार्य देवव्रत यांच्याकडे सोपवली आहे.

## ओबीसी महामोर्चा

राज्य सरकारन २ सप्टेंबर रोजी काढलेल्या शासन निर्णयामुळे ओबीसी समाजामध्ये अस्वस्थता निर्माण झाली आहे. या शासन निर्णयामध्ये आधी 'पात्र' असा शब्द होता जो वगळून पुन्हा नवीन शासन निर्णय काढण्यात आला. तो ओबीसींच्या हक्कावर गदा आणणारा आहे. या विरोधात १० ऑक्टोबर रोजी विदर्भातील सर्व ओबीसी संघटनांचा नागपुरात महामोर्चा निघणार आहे अशी घोषणा काँग्रेस विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी केली. विदर्भातील ओबीसी संघटनांची दुसरी बैठक आज नागपुरात पार पडली. नागपुरात १० ऑक्टोबर रोजी होणाऱ्या महामोर्चाची सुरुवात यशवंत स्टेडियम इथून होणार, तर मोर्चाची समाप्ती संविधान चौकात होईल.

नितीन गडकरी / नाम फाऊंडेशन

येणाऱ्या काळात शेतीत प्रगत तंत्रज्ञान आणून नवनवीन प्रयोग करायला हवेत, शेतमालावर प्रक्रिया करून उत्पादन वाढवण गरजेच आहे, तरच शेतकरी वाचेल आणि त्यांच्या आत्महत्या थांबू शकतील. असं मत केंद्रीय रस्ते आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी व्यक्त केलं.नाम फाउंडेशनच्या दशकपूर्ती सोहळ्यानिमित्त आयोजित विशेष कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून गडकरी आज पुण्यात बोलत होते. राज्याचे उच्च आणि तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, उद्योग आणि मराठी भाषा मंत्री उदय सामंत, नाम फाउंडेशनचे नाना पाटेकर आणि मकरंद अनासपुरे, ज्येष्ठ शास्त्रज्ञ विजय भटकर आदी यावेळी व्यासपीठावर उपस्थित होते.

व्यापारी जुटान

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या स्वदेशीला प्रोत्साहन देण्याच्या आवाहनाला प्रतिसाद देण्याच्या हेतूनं देशभरातील व्यापारी संघटना, त्यांचे अध्यक्ष आणि महामंत्री यांचे दोन दिवसीय व्यापारी जुटान उद्यापासून नागपुरात आयोजित करण्यात येत आहे. उद्या सकाळी १० वाजता अग्रसेन भवन, रवि नगर इथं या कार्यक्रमाच उद्घाटन होईल. या जुटानमध्ये देशभरात स्वदेशीला प्रोत्साहन देण्यासंदर्भात धोरण तयार करण्यात येणार आहे. देशाच्या स्वातंत्र्यानंतर प्रथमच अशा प्रकारच्या उपक्रमाच आयोजन करण्यात येत असल्याची माहिती आयोजकांनी दिली.

जीएसटी

केंद्र सरकारन विविध वस्तूंवर तथा खाद्यपदार्थांवरील GST मध्ये कपात केली आहे यामुळे जीवनावश्यक वस्तू,कॅन्सर सारख्या उपचारावरील औषधी,जीवन विमा, स्टेशनरी,दुग्धजन्य पदार्थ यांच्या वरील GST कमी झाल्यान यवतमाळ मधील व्यापारी वर्गांसह महिला वर्गान स्वागत केल आहे. 'शितल असोपा' गृहिणीन यासंदर्भात प्रतिक्रिया दिली...

*मोदी सरकार ने जो अभी अभी निर्णय लिया है जीएसटी कपात का , इसके बारे में मैं उनका स्वागत करती हूँ. इस निर्णय के लिए अभी ये निश्चित रूप से हम महिला वर्ग के लिए बहुत ही फायदा जनक निर्णय है. हम अभी घर में नए नए व्यंजन बना सकते हैं और दूसरी*

*बात जो बाकी व्हेहिकल्स पे वगैरह जो जीएसटी उन्होंने घटा दिया है, इस कारण अभी हमारे यहाँ पे भी हमें कोई बच्चों के लिए, हमारे लिए जो वेहिकल्स लेने थे, कार लेनी थी, वो लेना पॉसिबल हो जाएगा।*

<u>साहित्य संमेलन अध्यक्ष</u>

सातारा इथं होणाऱ्या ९९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष म्हणून ज्येष्ठ साहित्यिक विश्वास पाटील यांची निवड करण्यात आली आहे. अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाच्या आज पुण्यात झालेल्या बैठकीत एकमतानं ही निवड झाल्याचं महामंडळाच्या कार्यवाह सुनीता राजे पवार यांनी आकाशवाणीला सांगितलं...........

*या बैठकीला चार घटक संस्था, सहा बृहन् महाराष्ट्रातल्या संस्था यांचे प्रतिनिधी उपस्थित होते आणि एक मतानं विश्वास पाटील यांची अध्यक्षपदासाठी निवड झालेली आहे.साताऱ्यामध्ये 2026 मध्ये जानेवारी महिन्यातल्या एक ,दोन,तीन , चार या चार दिवस संमेलन असणार आहे . परिचर्चा हा एक वेगळा प्रयोग आम्ही यामध्ये करतोय युवकांना आकर्षित करण्यासारखं काहीतरी असेल. बालकांसाठी काहीतरी आनंद मेळावा, असेल असं एक वेगळं आणि परिपूर्ण असं संमेलन करण्याचं आम्ही प्रयत्न करतोय.*

निवृत्त सनदी अधिकारी विश्वास पाटील यांनी पानिपत, पांगिरा, संभाजी, झाडाझडती यासह अनेक कादंबऱ्याचं लेखन केलं आहे. झाडाझडती या कादंबरीसाठी त्यांना १९९२ साली साहित्य अकादमी पुरस्कार प्रदान करण्यात आला होता. विश्वास पाटील हे सध्या साहित्य अकादमीच्या कार्यकारी मंडळाचे सदस्य आहेत.

<u>नक्षल्यास अटक</u>

खून,जाळपोळ आणि भूसुरुंग स्फोटासारख्या हिंसक कारवायांमध्ये सहभागी राहिलेल्या 'शंकर भिमा महाका' वय ३२ वर्षे या जहाल नक्षल्यास पोलिसांनी भामरागड तालुक्यातील तिरकामेटाच्या जंगलातून अटक केली आहे . तो भामरागड तालुक्यातील परायणार येथील रहिवासी असून, भामरागड दलमचा सदस्य होता. पोलिसांचा घातपात करण्याच्या हेतून तो तिरकामेटाच्या जंगलात वावरत होता

## बॉक्सिंग

ब्रिटनमध्ये लिव्हरपूल इथं झालेल्या जागतिक मुष्टियुद्ध अजिंक्यपद स्पर्धेत, महिलांच्या ५७ किलो वजनी गटात भारताच्या जस्मिन लँबोरियानं सुवर्ण पदक जिंकून इतिहास रचला आहे. राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेची पदक विजेती असलेल्या जस्मिननं अंतिम फेरीत पोलंडच्या जूलिया सेरेमेटाला ४-१ नं पराभूत केलं. भारताच्या महिला खेळाडूंनी या स्पर्धेत उत्तम कामगिरी करत एकूण तीन पदकं जिंकली.

## क्रिकेट

टी-20 आशिया चषक क्रिकेट स्पर्धेत दुबई इथं आज भारत आणि पाकिस्तान या पारंपरिक प्रतिस्पर्ध्यांमध्ये सामना होणार आहे. रात्री आठ वाजता खेळाला सुरुवात होईल. गेल्या फेब्रुवारीनंतर पहिल्यांदाच दोन्ही संघ एकमेकांविरुद्ध खेळणार आहेत. दरम्यान आज होणार असलेल्या भारत आणि पाकिस्तान सामन्या विरोधात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीनं राज्यभर 'माझं कुंकू, माझा देश' हे आंदोलन सुरू करण्यात आलं आहे. मात्र कोणताही खेळ असला तरी बहुराष्ट्रीय स्पर्धेमध्ये तुम्हाला खेळावच लागतं , असं प्रतिपादन भाजपाचे खासदार आणि माजी क्रीडामंत्री अनुराग ठाकूर यांनी केलं. सामन्याला होत असलेल्या विरोधाच्या पार्श्वभूमीवर ते माध्यमांशी बोलत होते.

## हवामान

राज्यात कालपासून पुन्हा एकदा पावसान जोरदार हजेरी लावली असून पुढील काही दिवस मुसळधार आणि अतिमुसळधार पावसाचा इशारा हवामान विभागान दिला आहे. बंगालच्या उपसागरात निर्माण झालेल्या कमी दाबाच्या पट्ट्यामुळे संपूर्ण राज्यात पावसाला पोषक वातावरण तयार झाले आहे. त्यामुळे पुढील चार ते पाच दिवस राज्यातील बहुतांश भागांत पाऊस कोसळण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे.विदर्भात आज नागपूरसह अनेक भागांत मुसळधार पावसाची नोंद झाली. हवामान खात्यान आगामी काही तासांत, यवतमाळ , अमरावती , वर्धा आणि नागपूर इथं पावसाची शक्यता वर्तविली आहे. दरम्यान उद्या देखील संपूर्ण विदर्भासाठी येलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. या दरम्यान विजांच्या कडकडाटासह वादळापासून सतर्क राहण्याचा इशारा देण्यात आला आहे.

*****